म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चारित्र
दा. क्र. ५७ ७२९८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
संग्रहालय क्रमांक ७८३ ५७८
लेखक द्वारकानाथ गोविंद वैद्य
सन १८९८
पुस्तकाचें नांव डॉ॰ आत्माराम पांडुरंग
५७८

७८३
चरित्र

च. २९

अनु-१६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :

P. B. W. SERIES NO. 3.

# डाक्टर

# आत्माराम

# पांडुरंग.

द्वारकानाथ गोविंद वैद्य.

मुंबई " कर्नाटक " छापखान्यांत छापविलें.

अक्टोबर १८९८.

रा० रा० वासुदेव बाबाजी नवरंगे

ह्यांस

त्यांचें अनुकरणीय आचरण, धर्मश्रद्धा, स्वमतानुसार
वर्तन, सत्यप्रीति, वृद्ध वयांतीलही त्यांची सर्व
समाज कार्याविषयींची अप्रतिम आस्था व
कळकळ व ह्यांचें मजवरील प्रेम
ह्यांबद्दल
हें त्यांच्या प्रिय मित्रांचें
अल्प जीवनचरित्र
प्रेम व आदरपुरस्सर
अर्पण केलें आहे.

द्वारकानाथ गोविंद वैद्य.

परलोकवासी

# डा. आत्माराम पांडुरंग.

॥ जब आया तूं जगतमें जग हंसे तूं रोय ॥
॥ करनी ऐसा लीजिये तूं हंस जग रोय ॥–कबीर.

## १

उपोद्घात–जन्म–बाळपण, गृहस्थिति–शिक्षण–धर्ममार्गाकडील प्रवृत्ति–वैद्यकीचा धंदा–आरोग्य–राजकीय विषयांवरील मतें, मान सन्मान वगैरे.

आपला नेहमींचा अनुभव असा आहे कीं, कुटुंबांत ज्यावेळीं एखाद्या मुलाचा जन्म होतो, त्यावेळीं सर्व कुटुंब आनंदांत असतें. प्रथमच मूल झालेलें असलें तर कोणी साखर वाटतो, कोणी पेढे वाटतो, कोणी वाजंत्री लावितो; सारांश, अशावेळीं आनंद प्रदर्शनार्थ लहान मोठीं आनंद प्रदर्शक कृत्यें करण्याचा प्रघात सर्वत्र आहे. जें बालक पुढें कदाचित् आपलें ज्ञान, विद्वत्ता, धूर्तता, नम्रता व सद्गुण इत्यादि गुणांनीं सर्व जगास प्रिय होणार, किंवा ज्याचा अंत जन्म झाल्यानंतर लागलाच थोड्या दिवसांनीं व्हावयाचा, किंवा जें पुढें अत्यंत दुर्व्यसनी निपजून आपणास, आपल्या मातापितरांस व आपल्या कुटुंबांतील सर्व लहान मोठ्या माणसांस कमीपणा आणणार, अशा त्या बालकास आपल्या जन्माप्रीत्यर्थ घरांत चाललेला आनंदोत्सव मुळींच कळत नसतो व तें वरील दोहऱ्यांत सांगितल्याप्रमाणें रडत असतें. कालांतरानें, मध्यंतरींच अंत न झाला तर, तें मोठें होऊन प्रौढ वयांत येतें व वर दर्शविल्याप्रमाणें त्याचा आयुष्यक्रम, ज्याप्रमाणें परिस्थिति असेल त्याप्रमाणें राहून, एके दिवशीं त्यास ह्या जगाची यात्रा संपवावी लागते. ह्या गत झालेल्या प्राण्याचा आयुष्यक्रम कितीही वाईट असला, तरी त्याच्या जन्माच्या वेळीं ज्यांनीं आनंद प्रदर्शक कृत्यें केलीं ते जर जीवमान असले तर ते, नसल्यास त्यांचे इतर आप्त इष्ट बंधु वगैरे सर्व कुटुंबांतील

माणसें त्याच्या वियोगाबद्दल दुःख करीत असतात, रूदन करीत असतात, व कोणी तर सारखा आक्रोश करीत आसतात, असा अनुभव आपणांस प्रत्यहीं येत आहे. कमी अधिक प्रमाणानें ही स्थिति आपल्यापुढें वारंवार येत असते. परंतु साधुवर्य कबीर यांनीं वरील दोहऱ्यांत ज्या स्थितीची महति गाइली आहे ती स्थिति ही नव्हे. मनुष्य प्राण्यानें मुद्दाम प्राप्तव्य ह्मणून त्यांनीं जी स्थिति सुचविली आहे ती ही कीं, ज्याचा अंत आतां समीप आला आहे तो त्यावेळीं 'हंसत' असला पाहिजे. ही विशेष स्थिति प्राप्त न झाली तर त्याच्या जिण्याचें सार्थक झालें नाहीं असें ते ध्वनित करीत आहेत. परंतु ज्याचा अंत व्हावयाचा, ऐहिक यात्रा ज्याची संपावयाची त्यानें त्यावेळीं 'हंसावयाचें' ह्मणजे काय, असा प्रश्न यावेळीं सहज निघण्याचा संभव आहे. पुष्कळ लोक मरणकालीं चांगले सावध असतात. अशांपैकीं एखाद्यास वरील दोहरा अवगत असल्यामुळें प्राण सोडतेवेळीं हंसण्याचा जर त्यानें प्रयत्न केला, तर त्याचा एकंदर आयुष्यक्रम कितीही नीच असला, तरी अंतकाळीं तो केवळ हंसत होता ह्मणून त्यानें आपलें कर्तव्य केलें असें कधींही कोणी ह्मणणार नाहीं. ज्यानें समजूं उमजूं लागल्यापासून आपला वर्तनक्रम अत्यंत शुद्ध असा ठेविला, पापाचरण हें ज्यास कधीं माहित नाहीं, स्वकर्तव्यांत जो अहर्निश दक्ष, परोपकाराकडे ज्याचा सर्व कल, मानापमानाविषयीं जो अगदीं निष्काळजी, ज्याचा स्वभाव अति नम्र, जो धर्मशील, पापभीरू, आपल्या दोषांविषयीं जो नेहमी सावध असा जो कोणी थोर पुरुष असेल त्याची परलोकगमनास नेहमीं तयारी असावयाची. आपला परलोकीं जाण्याचा काल समीप येत चालला आहे, ह्मणून मात्र तो ईशचरणीं लीन असावयाचा असा प्रकार व्हावयाचा नाहीं. दुराचरणभय व सदाचरणप्रीति हीं त्याचेंठायीं इतकीं बिंबून गेलेलीं असावयाचीं कीं, त्याचें नित्याचें आचरण ईश्वरास भिऊनच असावयाचें. अंतकाळीं क्षणिक व्यथेमुळें अशा थोर पुरुषांची शारिरिक स्थिति कोणत्याही रीतीची असली तरी त्यांनीं आपला प्राण 'हंसतच' सोडला असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. आणि अंतसमयीं, तूं हंसत असला पाहिजेस, व सर्व जग तुझ्या वियोगजन्य दुःखा-

मुळें विपत्तींत असलें पाहिजे, असें जें साधु कबीर यांनीं सुचविलें आहे, त्याचा तरी अर्थ असाच आहे.

वरील प्रकारच्या अत्यंत थोर, सन्माननीय, सात्विक, व शुद्धाचरणी पुरुषांत मोडणारे जे **डा. आत्माराम पांडुरंग** त्यांचें अल्प जीवन चरित्र येथें देत आहों.

**डा. आत्माराम** हयात असतां कांहीं वर्तमान पत्रांच्या रिपोर्टरांनीं व कांहीं चरित्र लेखकांनीं त्यांस त्यांच्या चरित्राविषयीं माहिती सांगण्याविषयीं विनंती केली. परंतु अशा तऱ्हेची विनंति करणारांस ते नेहमी ह्मणत असत कीं, "माझें चरित्र लिहिण्यासारखें असें मीं काय केलें आहे ! माझ्या हातून विशेष कांहीं झालें आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. माझें कर्तव्यकर्म मजकडून चांगल्या रीतीनें होत आलें आहे, किंवा होत आहे, अशी साक्ष माझें मन देत नाहीं. मग अशा स्थितींत तुह्मी माझें चरित्र लिहून त्यापासून जगास काय बोध होणार ! "

अशा रीतीचे उद्गार काढून त्यांनीं आपलें चरित्र, किंवा चरित्रांतील कांहीं भाग प्रसिद्ध करणारांची जिज्ञासा अनेक प्रसंगीं तृप्त केली नाहीं. परंतु त्यांच्या मृत्यूपूर्वीं सुमारें साहा महिनें त्यांचें चरित्र जाणण्याविषयीं आह्मीं आपली उत्कटेच्छा प्रगट केली. किती तरी दिवस त्यांनीं आपल्या ठराविक उत्तरानें आमची समजूत करण्याचा प्रयत्न केला. पण आमचा व आमच्या मित्रांचा अत्याग्रह पाहून, व आह्मांवर त्यांचें प्रेम होतें ह्मणूनच, त्यांनीं आपल्या चरित्राविषयीं आह्मांस बरीच माहिती दिली. त्यांनीं दिलेल्या माहितीच्या आधारानेंच पुढील चरित्र लिहिलें आहे.

**डा. आत्माराम** यांचा जन्म सन १८२३ सालीं, ता० २३ डिसेंबर रोजीं, मुंबईंतच झाला. ह्यांचे वडील हे अगदीं जुन्या पद्धतीचे असत, व ते साधारण गरिबींत असत. तशांतून कुटुंबांत बरींच मुलें बाळें असलीं ह्मणजे गरिबीनें काळ कंठणाऱ्या कुटुंबास बऱ्याच हाल अपेष्टा काढाव्या लागत असतात. ह्यांच्या वडिलांस एकंदर १९ मुलें झालीं. पैकीं मोठीं फक्त पांच झालीं. **दादोबा पांडुरंग** सर्वांत वडील.

यांचे वडीलांचे नांव **पांडुरंग यशवंत**. हे **जमशेटजी बाटलीवाला** यांचे पेढीवर नोकरीस होते. व तेथें त्यांस दरमहा १०० रुपये मिळत असत. **आत्माराम दादांच्या** मातोश्री. सौ० **यशोदाबाई** ह्या शेवटच्या मुलाच्या वेळीं वारल्या. त्यावेळीं डा. **आत्माराम** १२ वर्षांचे होते. पाउणशें वर्षांपूर्वी सरकारी शाळा नसतच असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. त्यावेळीं मराठी लिहितां वाचतां येणारांचासुद्धां सरकार दरबारांत मोठा मान राखण्यांत येत असे. मग थोडें ट फ इंग्रजी जाणणाराची तर गोष्टच बोलावयास नको. **आत्माराम दादा** ह्मणत असत कीं, इंग्रेजी सही व थोडें बहुत कसें बसें लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांना सरकारानें पालख्यांतून बसवून नेत असलेलें मी पाहिलें आहे ! असो. **आत्माराम दादा** ह्यांचा मराठी अभ्यास तात्या पंतोजी वर्गांतल्या एका शिक्षकाच्या शाळेंत झाला. त्यावेळीं धुळीवरील पाट्यावर शिकवीत असत. हे तात्या पंतोजी, त्यांच्या वर्गांतील इतर सर्व पंतोजीप्रमाणें, मोठे कडक असत. ह्यांचा मुलांवर दरारा फार असे. ह्या शाळेंत **आत्मारामांचे** शिक्षण पूर्ण झाल्यावर ते सोसायटीच्या शाळेंत इंग्रेजी शिकावयास ते गेले. येथें त्यांचा तिसऱ्या नारमल स्कालरशिपपर्यंत अभ्यास झाला. तेथें शिकत असतां हल्लींच्या लोकांस जरा मजेदार वाटणारा एक प्रकार घडला. तो असा:— सूर्य स्थिर आहे, पृथ्वि व चंद्र भ्रमण करीत आहेत, ह्या गोष्टी आतां अगदीं लहानांच्या सुद्धां तोंडीं झाल्या आहेत. इंग्रेजी शाळेंत जाणाऱ्या लहान मुलांना जरी ह्या माहितीपासून विशेषसा बोध होत नसला तरी त्यांना ह्या माहितींत असंभाव्य किंवा विलक्षण असें कांहीं आहे असें वाटत नसतें. परंतु तरुण **आत्मारामांच्या** वेळची स्थिति निराळी होती. इंग्रजी शिकवीत असतां त्यांच्या शिक्षकानें वर्गांतील सर्व मुलांस ही माहिती सांगितली व त्यावेळीं त्याला त्या शाळेंत जीं साधनें उपलब्ध होतीं त्यांच्या साह्यानें साधारणपणें त्यानें त्यांची खातरीही करून दिली. अर्थात् मुलांना हा मोठा चमत्कार वाटला. जणूं काय आपल्या समोर नवीनच सृष्टि आहे असें त्यांना वाटूं लागलें. व शिक्षकांनीं आपणास मोठी महत्वाची माहिती दिली ह्मणून जो तो विद्यार्थी आपला नवीन शोध खालच्या किंवा वरच्या

इयत्तेंतील विद्यार्थ्यांस सांगूं लागला. ह्याच शाळेंत मराठी धडे चालले असतांना तरुण **आत्मारामानें** आपल्या समोर मोठें थोरलें पागोटें चढवून गुडघ्यास उपरणें गुंडाळून बसलेल्या जुन्या पद्धतीच्या शिक्षकास आपला नवीन शोध सहज बोलतां बोलतां सांगण्याचा विचार केला व संधि साधून ह्मणाला, "मास्तर, आपली ही पृथ्वि फिरते ह्मणतात, आणि ती नारिंगा सारखी वाटोळी आहे असें आमचे इंग्रजी मास्तर सांगत होते तें खरें कायहो ?" हें ऐकतांच त्या शिक्षकास फार राग आला, व जणूंकाय ह्या नवीन विचाराच्या योगें मुलें भ्रष्ट होतील, असा विचार मनांत आल्यामुळेंच तो आपल्या त्या रागाच्या आवेशांत ह्मणाला, "पृथ्वि तर कांहीं अद्याप फिरूं लागली नाहीं, ती आहे तेथेंच आहे, व ती नेहमीं तेथेंच राहणार, मात्र तुह्मां सर्वांचीं आणि इंग्रजी मास्तरांचीं सुद्धां डोकीं आतां फिरूं लागलीं आहेत !" सर्व वर्गांत ह्यावेळीं मोठा हंशा पिकला हें सांगावयास नकोच ! ह्या प्रसंगाची डा० **आत्माराम** ह्यांस नेहमीं नेहमीं आठवण होत असे. व ज्याज्यावेळीं अशा तऱ्हेच्या गोष्टी निघत त्यावेळीं ते आपल्या त्या शिक्षकाची गोष्ट नेहमीं सांगावयाचे.

ह्या शाळेंत ह्यांचा अभ्यास फारच चांगला असे. शाळेंत असतां ह्यांचा गणित विषय हा फार आवडीचा असे. व कधींकधीं तर हे स्वप्नांतही कठीण कठीण उदाहरणें सोडवीत असत ! शाळेंत असतां यांचें शिक्षण प्रो. **अँडरसन** व **हार्कनेस** ह्यांच्या देखरेखीखालीं झालें. प्रो. अँडरसन् हे मोठे धार्मिक असल्यामुळें त्या वेळीं तरुण **आत्मारामाच्या** हृदयांत धर्माचें बीजारोपण झालें. हें बीज अधिकाधिक वृद्धिंगत होण्यास चौपाटीवरील त्या वेळीं चालू असलेला **रे. नेसबिट** यांचा धर्मवर्ग कारण झाला. धर्मसंबंधी विचार करावयाची त्यांस स्फूर्ति व्हावयास आणखी एक कारण झालें. त्यांचे वडील रोज कांहीं तरी पुराण सांगत असत. **हरिविजयांतील** कथांचें पुराण लाविलें असतां कृष्ण कायतो एक खरा; दुसरे त्याचे पुढें कांहीं नाहींत असें त्यांनीं सांगावें. त्याचप्रमाणें **रामविजय** लाविला असतां रामासंबधानें ही त्यांनीं तसेंच सांगावें. हें तरुण **आत्मारामाच्या** तीक्ष्ण बुद्धीस विलक्षण वाटावें.

त्याच्या मनांत असा विचार यावयाचा कीं, एका ग्रंथांत एका विशिष्ट देवतेचे महत्व गातेवेळीं दुसऱ्या देवतांस कमीपणा आणावयाचा; व त्या कमीपणा आलेल्या देवतांसंबंधानें वर्णनाचा प्रसंग आल्यास पूर्वींच्या सर्वगुण मंडित देवता निस्तेज व्हावयाच्या, हें चमत्कारिक होय. आणि असा विचार मनांत आला ह्मणजे त्यांनीं ह्या संबंधाच्या आपल्या सर्व शंका वडिलांस विचाराव्या. पण, त्यांनीं कांहीं तरी उत्तरें देऊन, चिरंजिवाचें समाधान करण्याचा प्रयत्न करावा. अर्थात् तसल्या उत्तरांमुळें त्यांचें समाधान न झाल्यामुळें ते दिवसें दिवस धर्मसंबंधानें साहजिकपणें ज्यास्त ज्यास्त विचार करूं लागले.

डा. **आत्माराम** ह्यांचें प्रो. **अँडरसन** सारख्या धर्मशील शिक्षकाच्या हाता खालीं शिकणें, रे. **नेसबिट**च्या धर्मवर्गांत जाणें व घरीं पुराणें वगैरेंचें वाचन होत असतां वडिलांपाशीं त्यांनीं निरनिराळ्या शंका काढणें, ह्या गोष्टींपासून आपणांस एक दोन महत्वाचे धडे घेतां येण्यासारखे आहेत. लहानपणीं आमच्या मुलांस धर्मशिक्षण नसल्यामुळेंच पुढें तरुण वयांत त्यांच्यांत पूर्ण धर्मौदासिन्य दिसून येतें. मिशनरींच्या शाळेंत मिळत असणारें शिक्षण एकतर्फी असतें ही गोष्ट खरी आहे. व तीव्र बुद्धीच्या विद्यार्थ्यास कोणत्याच धर्माचें शिक्षण नसल्यास त्याचा आपल्या शिक्षकाच्या धर्माकडे ओढा लागण्याचा संभव आहे, हें ही खोटें नव्हे. पण, मिशनरी शाळांत मुलांस शिक्षण मिळत असतां त्यांस त्यांचीं आईबापें स्वधर्माविषयीं थोडी माहिती करून देत जातील तर त्यामुळें त्यांस गंभीर विषयांवर विचार करण्याची संवय लहानपणींच लागून त्यांची विवेचकशक्ति वृद्धिंगत होण्याचा संभव नाहीं काय? पण, हे विचार आमच्या डोक्यांत खेळत नाहींत. आणि असे विचार जरी मनांत आले तरी त्यापुढें आमची मजल जात नाहीं. सरकारी किंवा खासगी शाळांत धर्मशिक्षण मिळत नाहीं ह्मणून प्रसंग विशेषीं सरकारास किंवा खासगी शाळा काढणारांस दोष देणारांच्या घरची स्थिति पाहिली तरी विचारापलीकडे त्यांची मजल गेली आहे असें कोणास आढळून यावयाचें नाहीं. शाळेंत धर्मशिक्षण नाहीं, घरींही तीच स्थिति, ज्या संगतींत मुलें राहणार त्यांनाही धर्म

शिक्षणाचा गंध नाहीं अशा स्थितींतील मुलें तरुण वयांत केवळ धर्मलंड झालीं तर त्यांत आश्चर्य तें काय ? असो.

डा. **आत्माराम** यांचा शाळेंतील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर तेथेंच त्यांस शिक्षकाची जागा मिळत होती; परंतु त्याच वेळीं ह्मणजे सन १८४९ सालीं **ग्रँट मेडिकल** कॉलेज प्रथमच उघडण्यांत आल्यामुळें त्यांनीं ही नोकरी नाकारली व तेथें हे वैद्यकीचा धंदा शिकावयास गेले. कॉलेजांत असतां त्यांस फुकट शिक्षण मिळून दरमहा सात रुपयांची स्कालरशिपही मिळत असे. व पुढें त्यांस दरमहा २९ रुपयांची स्कॉलरशिप मिळूं लागली. ग्रँट मेडिकल कॉलेजांतून **आत्माराम पांडुरंग** व दुसरे चौघे गृहस्थ हे प्रथम पास झाले. त्यांपैकीं डा. **लिसबो** १८९७ पर्यंत हयात होते. व डा. **आत्माराम** हे एकटेच अद्यापपर्यंत जीवमान असत. डा. आत्माराम पास झाले त्याच वेळीं देवी टोंचण्याचा प्रघात नव्यानेंच सुरू झाला. भिंवडीची हवा वाईट ह्मणून तेथें देवी टोंचण्याच्या प्रयोगास यश येणार नाहीं असें मोठमोठ्या वैद्यांचें मत पडलें; तरी सुद्धां डा. **आत्माराम** यांनीं आपली नेमणूक मुद्दाम तेथें करून घेऊन तें काम अति उत्तम रीतीनें बजाविलें. वैद्यकीचा धंदा करूं लागल्यावर प्रथमतः ह्यांस बराच त्रास झाला. इंग्रजी औषधांवर व ती देणाऱ्या व्यक्तीवर लोकांचा विश्वास बसेपर्यंत त्यांना चांगला पैसा मिळूं लागला नाहीं. ह्यांच्यापेक्षां डा. **भाऊ दाजी** ह्यांची भरभराट विशेष लवकर झाली. एकदा एखादा रोगी आपल्याकडे आला ह्मणजे त्यानें आपल्या सांगण्याप्रमाणें चालणें अत्यंत जरूर आहे असें त्यांस वाटत असे. आपल्या इच्छेविरुद्ध रोग्यानें कोणतीही गोष्ट केली ह्मणजे ती त्यांस मुळींच खपत नसे. आणि ते नेहमीं असें ह्मणत असत कीं " माझ्याप्रमाणें जर इतर सर्व डाक्टर करितील तर त्यांस आपल्या रोग्याच्या प्रकृतीचें मान कळण्यास फारसा वेळ लागा. वयाचा नाहीं. लोकांना अशा वेळीं वाटत असतें कीं मी मोठा गर्विष्ट आहें-पण ही त्यांची चूक असते. रोगाचें निदान ठरवून आह्मीं औषध द्यावयाचें व कोणत्या रीतीनें वर्तलें असतां फायदा होईल हें आह्मांस पहावयाचें असल्यामुळें व अमूक रीतीनें वागलें असतांच फायदा होण्याचा संभव

अशी आमची खातरी असल्यामुळें आह्मीं तसें सांगावें. आणि त्याच्या विरुद्ध रोग्यानें वर्तन केलें, किंवा त्याच्या हातून कोणी करविलें ह्मणजे माझ्या सारख्यास राग येणें अगदीं साहजिक " असें ते ह्मणत असत. रोग्यानें आपल्या प्रकृतीचें मान कळविलें तर त्याबद्दल त्यांस कांहीं वाटत नसे. पण थंडी अगर उष्णता होण्यामुळें माझी अशी प्रकृति झाली, मला वाटतें मला अशी अशा बाधा झाली असली पाहिजे, अशा तऱ्हेची चर्पटपंजिरी रोग्यानें चालविली ह्मणजे त्यांस राग येत असे. रोगाचें निदान ठरविणें व त्यावर औषध देणें हें डाक्टराचें काम असतां, रोग्यानें विनाकारण त्यास व्याख्यान देत असणें हें गैर होय असें त्यांचें मत असे. डा. आत्माराम यांचें मरणसमयीं जरी ७९ वर्षांचें वय होतें तरी त्यांचा एकही दांत अद्याप पडला नव्हता किंवा हालतही नव्हता! अद्यापपर्यंत ते तीन तीन चार मजले बेलाशक अगदीं सहज चढून जात असत. आपली प्रकृति अद्यापपर्यंत अशी सशक्त कोणत्या रीतीनें राहिली असें जेव्हां जेव्हां त्यांस कोणी विचारी तेव्हां तेव्हां त्यास ते सांगत असत कीं " मी लहान असतां अगदीं अशक्त असे. हवेंत थोडा फेरबदल झाला ह्मणजे माझी प्रकृति बिघडत असे. पण त्याचवेळीं थंड पाण्याच्या आंघोळीनें माझें आयुष्य वृद्धिंगत होईल असें मला वाटलें. तसें मी आजपर्यंत करीत आहें. इतर डाक्टरांचा ह्या गोष्टीवर विश्वास बसो अगर न बसो. माझी तरी अशी खातरी आहे कीं, मी आजपर्यंत वांचावयास प्रातःकाळची थंड पाण्याची आंघोळ बऱ्याच अंशीं कारण झाली आहे."

## डा. आत्माराम यांचीं राजकीय गोष्टींबद्दल मतें.

सामाजिक सुधारणा व अध्यात्मिक उन्नति ह्यांचे बरोबरच राजकीय सुधारणा होणें अवश्य आहे असें त्यांस वाटत असे. कधीं कधीं कांहीं कांहीं अधिकारी बिनाकारण अन्ययाचीं कृत्यें करीत तें पाहून त्यांस फार वाईट वाटे. अशा वेळीं ते विनोदानें ह्मणत असत कीं, पेशवाईंत ब्राह्मण अधिकारी फार मत्सरी झाले ह्मणून त्यांस राज्य विन्मुख व्हावें

लागलें असें ह्मणतात. पण अशा तऱ्हेचें अन्यायाचें वर्तन ठेवणारे लोकही पांढरे भट होत. जर पेशवाईंतील ब्राह्मणांना नांवें ठेवावयाचीं तर ह्या नवीन भटांस तरी कां नांवें ठेवूं नयेत? केवळ राजकीय सुधारणेच्याच मागें लागणें त्यांस मुळींच पसंत नसे. ह्या धोरणानें आपली खरी उन्नति कधींही होणार नाहीं असें ते नेहमी ह्मणत असत.

**मान सन्मान.**

डा. **आत्माराम** हे येथील युनिव्हरसिटीचे फेलो असून जे. पी. ही होते. हे एक लोकांचे पुढारी होते ह्मणून मुंबईसरकारनें त्यांस शहराचे शेरिफही नेमिलें होतें. येथील अनेक लोक हितवादीं संस्थांशीं त्यांचा निकट संबंध असे.

---

## २.

सामाजिक सुधारणा–लोकनिंदा–विचार व आचार–कर्तव्यदक्षता–कौटुंबिक स्थिति, अध्यात्मिक उन्नति, जुनी मंडळी, त्यांचे दोष–आड मार्ग–नीति धैर्याची वाण–प्रार्थनासमाज–अलीकडील वर्तन–बौद्धधर्म–भांडरकर लायब्ररी–अंत्येष्टी–डा. **आत्माराम** ह्यांची खरी योग्यता–प्रतापचंद्र मुजुमदार-लोकमत–उपसंहार.

“ सुधारणा ” ह्या शब्दास आपल्या लोकांतील एका विशेष तऱ्हेच्या मंडळींनीं इतकें चमत्कारिक स्वरूप दिलें आहे कीं, ह्या शब्दाचा नुसता उच्चार केल्याबरोबर कपाळाला आठ्या घालणारे, किंवा आपल्या शुभ्र दंतपंक्ति दाखविणारे अनेक हरीचे लाल हिंदुसमाजांत सहज आढळतील. त्यांना ह्या विषयावर वादविवाद करण्याची इच्छा नसते व लोक काय सांगत आहेत तें शेवटपर्यंत ऐकणेंही त्यांना आवडत नाहीं! सुधारकांचा नामनिर्देश झाल्याबरोबर त्यांची टवाळकी करावयाची हेंच ह्यांचें व्रत! असे लोक एके बाजूस ठेविले तरी सामाजिक प्रगतीस प्रामाणिकपणें अवरोध करणारा जो दुसरा पक्ष आहे त्या पक्षाकडून सुधारक ह्मणविणारांविरुद्ध जे आक्षेप घेण्यांत येत असतात त्यांत कांहींच अर्थ नसतो, असें ह्मणतां येणार नाहीं. नवीन विचारांची स्फूर्ति व्हावयास आधीं बराच काळ लागतो, विचारांचा खल होऊं लागला ह्मणजे उच्चार होऊं लागतो व इतकें झाल्यानंतर अखेरची पायरी विचार व

उच्चार ह्यांस शोभेसें आचरण हीं होय, हें जरी खरें आहे, तरी विचार व उच्चार ह्यांच्या मागें लागलेल्या जुन्या सुधारकांनीं आचाराविषयीं फारच थोडा विचार केल्यामुळें, व अद्याप आचाराचा काळ आला नाहीं, अशी सबब त्यांचेवेळीं नेहमीं पुढें आली गेल्यामुळें, लोक समूहापुढें प्रथम ही सबब आल्याला आज जरी जवळ जवळ पन्नास वर्षें होत आलीं आहेत, तरी " अद्याप आचाराचा काळ आला नाहीं " ह्या मंत्राचा जप आमची नवीन विचारांची मंडळी करीत आहे तो आहेच!! त्यावेळच्या परिस्थितीपेक्षां हल्लींची स्थिति किती तरी सुधारली आहे, लोकमतांत किती तरी फरक झाला आहे, समाजाकडून होणारा छळ किती तरी प्रमाणानें कमी झाला आहे, तरी आचाराचा वेळ अद्याप आला नाहीं, असें आपलें आह्मांला वाटत आहे तें आहेच! परंतु जुन्या काळच्या सुधारकांत बोलण्याप्रमाणें चालणारे जर कोणी सुधारक निपजून गेले असले, तर त्या सर्वांत **आत्माराम** दादा ह्यांचा नंबर पहिला लागला पाहिजे. समाजानें अमुक अमुक फरक केल्यावांचून समाजाची उन्नति व्हावयाची नाहीं, असें बोलून ते कधींही राहिले नाहींत. आपल्या बरोबरीच्या नवीन विचारांच्या लोकांनीं कशा चुका केल्या हें त्यांस पूर्णपणें अवगत होतें. एखाद्या सुधारणेविषयीं रिकामी वल्गना करीत बसणें त्यांना मुळींच आवडत नसे. आणि ह्मणूनच ज्या ज्या वेळीं आपल्या विचारांप्रमाणें कृती करून दाखविण्याचा प्रसंग येई त्या त्या वेळीं आपल्या विचारा प्रमाणें चालतांना मार्गांत येणाऱ्या अडचणींकडे ते बिलकुल लक्ष देत नसत. वास्तविक पाहतां आज जी पिढी आपल्या नवीन विचारामुळें अकारण व सकारणही लोक निंदेस पात्र झाली आहे त्या पिढीपूर्वींचे **आत्मारामदादा**. आज बिन दिक्कत ज्या मंत्राचा जप आह्मीं करीत आहों तो त्यांस करावयास चांगली सवड होती. पण, त्यांनीं तसें केलें नाहीं, हें त्यांच्या आचरणावरून चांगल्या रीतीनें व्यक्त होत आहे. डा. **आत्माराम** ह्यांचें लग्न त्यांच्या १४ व्या वर्षी झालें व ह्या वेळीं त्यांच्या पत्नीचें वय जरी फक्त साहा वर्षांचें होतें तरी ह्या देशहितविघातक रूढीचा प्रवेश त्यांनीं आपल्या कुटुंबांत मुळींच होऊं दिला नाहीं. आपल्या मुलींस उच्चप्रतीचें शिक्षण द्यावयाचें, बालविवाहा-

त्या कुटुंबांत प्रवेश होऊं द्यावयाचा नाहीं, असा त्यांचा निश्चय असे. सौ. दुर्गाबाई व प. वा. अनाबाई ह्यांस त्यांनीं बरेच दिवसपर्यंत शिक्षणासाठीं मिसेस मिचेल नांवाच्या बाईकडे ठेविलें होतें. त्यावेळीं ह्यांच्या विरुद्ध त्यांच्या ज्ञातींत बराच गवगवा झाला, लोक त्यांना नाहीं नाहीं तीं दूषणें देऊं लागले. घरांतूनही त्रास होत असे. पण आपलें कर्तव्य करीत असतां होणारा त्रास शांतपणें सहन करणें हेंही आपलें कर्तव्य आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांनीं लोकांच्या टीकेकडे बिलकुल लक्ष न देतां आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. लोकनिंदा सहन करण्यांत मोठीशी मातब्बरी नाहीं. प्रथम अनुचित कृति करून, नंतर तिचे बद्दल लोकांकडून होणारी टीका निमूटपणें ऐकून घेणाराचे धन्यवाद कोणीही विचारी मनुष्य गावयाचा नाहीं. कारण, आपण कर्तव्यपराङ्मुख झाल्यामुळें विरुद्ध टीकेचा आपल्यावर भडिमार होत आहे हें तो जाणून असतो. लौकिकदृष्टया मी दोषी आहें, असे ह्मणण्या पलीकडे त्यास इलाजच नसतो. पण एखादा मनुष्य स्वकर्तव्यदक्ष असूनही लोकांत त्याची टवाळकी चालली असतां तिकडे दुर्लक्ष करून आपल्या विचारास योग्य वाटणाऱ्या आचरणापासून न ढळणें ह्यांत खरा थोरपणा आहे. आत्माराम दादांच्यांत हा थोरपणा होता, हें त्यांनीं आपल्या आचरणानें सर्वांस चांगल्या रीतीनें दाखवून दिलें आहे. असो.

डा. आत्माराम यांनीं आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं फारच पैसा खर्च केला. त्यांनीं मिळविलेलें सर्व द्रव्य मुलांच्या शिक्षणाकडे लाविलें. यांचे वडील चिरंजीव रा. मोरेश्वर हे प्रथम विलायतेस सिव्हील सर्विसच्या परीक्षेसाठीं गेले. तेथें ते ती परीक्षा पसार झाले नाहींत. येथें आल्यावर त्यांस राजकोट येथील राजकुमार कालेजांतील व्हाइस प्रिन्सिपालची जागा मिळाली. ह्या जागेवर ते बरेच दिवसपर्यंत होते. हल्लीं ते काठेवाडांतील विद्याखात्याचे इन्स्पेक्टर आहेत. दादांचे दुसरे चिरंजीव आनंदराव हे फार हुशार व तरतरीत असत. ते विलायतेहून एम. बी. ची परीक्षा पसार होऊन आले होते. पण तेथेंच असतां त्यांस दम्याची भावना झाली होती. व येथें आल्यावर त्यांचा थोड्याच दिवसांनीं अंत झाला. आनंदरावांचा अंत झाल्यानंतर

त्यांच्या मातोश्री वियोगजन्य दुःखामुळें खरोखरीच वेड्या झाल्या होत्या. पण कांहीं काळानें त्यांचें डोकें पूर्वस्थितीवर आलें. आत्माराम दादा यांसही आनंदरावाच्या मृत्यूमुळें अनावर दुःख झालें. त्यावेळीं ते बायबल वाचीत असत. त्यांतील जॉबची गोष्ट वाचतांचे अनेक उदात्त विचार त्यांच्याठायीं उदित झाले व त्या दिवसापासून ते हळु-हळु आपलें दुःख विसरूं लागले. मनुष्यावर एका मागून एक अशीं अनेक संकटें येऊं लागलीं ह्मणजे त्याच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक होते. आलेलीं संकटें, विवेकाचें अवलंबन करून, शांतपणें फार थोड्यांस सहन करितां येतात. परंतु डा. आत्माराम हे ह्या फारच थोड्यांत मोडणारे एक होते. त्यांच्यावर एकामागून एक अशीं बरींच संकटें आलीं. पण, तीं त्यांनीं इतक्या शांतपणानें सहन केलीं कीं, त्यांच्या जागीं दुसरें कोणी असतें तर त्याची स्थिति काय झाली असती नकळे. असो. ह्यांचे तिसरे चिरंजीव रा. रामचंद्र हे येथील जीवराज बाळू गिरणीचे सेक्रेटरी आहेत. चवथे चिरंजीव रा. ज्ञानेश्वर हे विलायतेहून वैद्यकीची परीक्षा पसार होऊन आले असून ते माटुंगा येथील लेपर असायलमवर डाक्टर आहेत. डा. आत्माराम दादाची कनिष्ट कन्या, कुमारी माणकबाई ह्या एल. एम. एस. असून एल. आर सी. पी. ही. आहेत. त्यांनीं गेल्या दोन सालीं प्लेगच्या दिवसांत फारच श्रम घेतले. व पारशी इस्पतळांत निस्वार्थ बुद्धीनें आपल्या जिवावरील जोखमास न जुमानता, गुदस्तां चांगली कामगिरी बजावल्याबद्दल हल्लीं परलोकवासी झालेल्या सर जमशेटजी ह्यांच्या हस्तें सन्मानार्थ ह्यांस एक चांदीचा पेला नजर करण्यांत आला. त्या अद्याप अविवाहीत आहेत. व त्यांच्या धंद्यांत त्यांस दिवसेंदिवस चांगलें यश येत आहे. डा. आत्माराम यांचे दुसरे दोघे चिरंजीव अविवाहित आहेत.

## ह्यांचें धर्माचरण वगैरे.

धर्मसंबंधीं विचार योग्य दिशेनें करूं लागावयास ह्यांस ह्यांच्या दोघां बंधूंची, ( दादोबा व भास्करराव ) मोठी मदत झाली. ह्यांच्या येथें प्रतिवर्षीं गणपतीचा उत्सव दीड दिवस होत असे. त्यावेळीं

दादोबा आरतीस बिलकुल येत नसत. हें पाहून **आत्माराम** दादांस फार वाईट वाटे. व मला पैसे मिळूं लागले ह्मणजे मी हा उत्सव सहा दिवस करीन, असें ते ह्मणत. परंतु हे विचार त्यांच्यांत फार दिवस राहिले नाहींत. वडिलानंतर **भास्करराव** कुटुंबांतील प्रमुख झाले. त्यावेळीं त्यांनीं गणपतीच्या उत्सवास कायमचा फांटा दिला. व आपल्या मातोश्रीचें वर्षश्राद्धही जुन्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं केलें नाहीं. ह्यावेळीं रा. ब. **रामबाळकृष्ण** व **भाऊ महाजन** हे मोठे तरतरीत सुधारक असत. वर सांगितलेल्या चौपाटीवरील **रे. नेसबिट** यांच्या वर्गांत हे तिघेही अगदीं नियमानें जात असत. त्यावर्गांत जो उपदेश वगैरे होत असे त्यांतील ग्राह्य तेवढें घ्यावयाचें असा ह्यांचा निश्चय असे. मध्यंतरीं रा. ब. **राम बाळकृष्ण** ह्यांची थोडी चलबिचल झाली होती. परंतु भाऊ माहाजन यांनीं त्यांस वेळेवरच हात दिला. यानंतर कांहीं काळानें ह्या कंट्या सुधारक चमूनें कांहीं मित्रांच्या साह्यानें "एक गुप्त मंडळी" काढिली. हींत धर्मसंबंधानें विचार होत असे. त्यांनीं कांहीं नियमही केले होते व ईश्वराचें अस्तित्व मानणारांसच मंडळींत दाखल करण्यांत येत असे. ह्या मंडळीस लवकरच **मोरोबा विनोबा, बाबा पदमनजी** वगैरे मंडळी येऊन मिळाली. बाबा नंतर खिस्ती झाले. याच मंडळीस नंतर **परमहंस सभा** हें नांव देण्यांत आलें. परमहंस मंडळीपैकीं सर्वांस जातीचीं सामाजिक बंधनें शिथिल करावींशीं वाटत असे; पण तसें करावयास उघडपणें त्यांची तयारी नसे. कांहीं काळानें एकत्र भोजन वगैरे जरी होऊं लागलें तरी हा सर्व प्रकार गुप्त रीतीनें होत असे. येथवर मजल आल्यावर कांहीं मंडळीनें माघार घेतली. व सभासदांच्या सह्यांचें पुस्तकच—जातीकडून त्रास होऊं नये ह्मणून—कोणी लांबाविलें! दुसरें असें कीं, परमहंस सभेंत धर्मसंबंधानें जितकें विवेचन व्हावयास पाहिजे तितकें होतही नसे.

धर्मसंबंधानें स्वतंत्र रीतीनें विचार करून एकेश्वरी धर्माचा स्वीकार केलेल्या त्या काळच्या सर्व मंडळी विषयीं आमच्या ठायीं पूज्यबुद्धि आहे. पण, परमहंस सभा स्थापन करण्यापूर्वीं 'एक गुप्त मंडळी' स्थापन करण्यांत ह्या थोर लोकांनीं मोठी चूक केली व तीच आज पुष्क-

ळांस नडत आहे. पूर्वीपासूनच स्वतंत्र रीतीनें उघडपणें लोकांस अरुचिकर अशा विषयांचा ऊहापोह करण्याची वहिवाट ह्या लोक नायकांनीं घातली असती, व विचारास योग्य वाटणारें आचरण "गुप्त मडंळीच्या" खोलींत मात्र व्हावयाचें, ह्या प्रकारास जर त्यांनीं टाळा दिला असता, तर पुढें परमहंस सभेंतील सभासदांच्या नांवांचें पुस्तक लांबविल्या बरोबर सर्व सभासदांची जी तारांबळ उडाली ती उडाली नसती व नंतर उघडपणें एकेश्वरी धर्माप्रमाणें वर्तणाऱ्यांतून तीं मतें मान्य असून हीं निघून जाण्याचा प्रसंग कांहीं लोकांवर आला नसता. ह्या संबंधाचे आह्मीं हे आमचे विचार **डा. आत्माराम** ह्यांस एकेप्रसंगीं सांगितले. त्यावेळीं त्यांच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें शांतपणें आमचें ह्मणणें ऐकून घेतल्यावर ते ह्मणाले " होय, तुह्मी ह्मणतां तें एकार्थी खरें आहे. त्याचवेळीं ह्या गुप्त मडंळीच्या किंवा परमहंस पंथाच्या भानगडींत न पडतां उघडपणें विचारा प्रमाणें आचारास जर आह्मी सुरुवात केली असती, तर बरें झालें असतें खरें. पण, आमची ती जरी चूक झाली असली तरी ती सुधारणें तुमच्यासारख्या तरुणांच्या हातीं आहे ना? आह्मी जी चूक केली तीच तुह्मी पुन्हां न केलीत ह्मणजे सर्व वाद मिटणार आहे." ह्यावर आह्मी त्यांना काय उत्तर देणार?

**राम बाळकृष्ण** हे विलायतेस गेल्यावर मिस. कारपेंटर बाईशीं त्यांचा बराच परिचय झाला. कारपेंटर बाई येथें आल्यावर **राम बाळकृष्णां**कडे उतरणार होत्या. पण त्यावेळीं ते मृत्यु पावले असल्यामुळें त्या **आत्माराम** दादांकडे उतरल्या. कारपेंटरबाई आल्यापासून त्या प्रार्थना करण्यासाठीं सभा भरवूं लागल्या. ह्या सभांस **बाळ मंगेश वागळे, ना. म. परमानंद, वा. वा. नवरंगे, भास्करराव भागवत, मोरोबा विनोबा** आदिकरून मंडळी जात असे. कांहीं दिवसांनीं ह्या प्रार्थना अगदी नियमित रीतीनें सप्ताहिक होऊं लागल्या. ह्यावेळीं रत्नमालेंतून गीतें ह्मणत असत. ह्या वेळापासून **आत्माराम** दादांचीं धर्ममतें विशेष सबळ होऊं लागलीं. प्रथमतः कॉलेजांत असतां कांहीं कालपर्यंत तर ते नास्तिक होते. परंतु रसायणशास्त्र शिकत असतां अगदीं सूक्ष्म अशा कणासही Final cause (आदि कारण) आहे अशी त्यांची खातरी

झाली त्यावेळींच त्यांची ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं खातरी पटली; तरी पण ईश्वर जागृत असा आहे असें त्यांस त्यावेळीं वाटत नसे. तें ह्या वरील सभांमुळें वाटूं लागलें. प्रार्थनासमाजाच्या स्थापनेच्या कामीं ह्यांनीं तन मन धनें करुन मोठी झीज सोशिली आहे. समाजाची संस्थापना झाल्यापासून आमरणांत ते समाजाचे अध्यक्ष होते. प्रतिवर्षी सर्व सभासद एक मतानें त्यांचीच निवडणूक करीत असत, ह्यांच्यासारखे धर्मशील, शुद्धाचरणी, महानुभवी, आनंदी व नम्रस्वभावाचे असे आपणांत दुसरे कोणी नाहींत असें सर्वांस वाटत असे.

## भांडारकर पुस्तकालय व अलीकडील वर्तन.

अलीकडे अलीकडे **आत्माराम** दादांनीं आपला धंदा सोडून दिला होता. व त्यांनीं सर्व लक्ष धर्माकडे लाविलें होतें. येथील समाजांत डा. **भांडारकर** पुस्तकालयास पुस्तकें येऊं लागल्यापासून ते पुस्तकें वाचावयास येत असत. प्रथम प्रथम तर सुमारें आठ आठ तास ते समाजांत काढीत असत ! त्यांनीं ह्या लायब्ररीचा जितका फायदा घेतला तितका दुसऱ्या कोणीही घेतला नाहीं ! त्यांची **गौतम बुद्धा**विषयीं फार पूज्यबुद्धि असे. लायब्ररींतील बौद्धधर्मासंबंधीं सर्व पुस्तकें त्यांनीं केव्हांच वाचून टाकलीं. बौद्धधर्मासंबंधानें कांहीं तरी लिहिण्याचा त्यांचा विचार असावा. व त्यासाठीं त्यांनीं टिपणही करून घेतलें होतें. बौद्ध धर्माचीं तत्वें इतकीं उदात्त असतां त्याचा लय कां झाला असें त्यांस विचारितां त्यांनीं चरित्र लेखकास सांगितलें कीं, " आपला उपनिषदांतील पुरातन व अत्यंत उदात्त अशा धर्माचा लय व्हावयास जीं कारणें झालीं तींच बौद्ध धर्माच्या लयासही झालीं. बुद्धानें सांगितलेलीं सर्व उदात्त तत्वें पुस्तकांत राहिलीं. सर्व भिक्षू प्रसंगविशेषीं बुद्धाच्या आज्ञेनुसार वर्तत नसत. लग्नकार्य वैगेरे व्हावयाचा प्रसंग आला ह्मणजे बुद्धानें उपदेशिलेला धर्म खुद्द भिक्षू एके बाजूस ठेऊन पूर्वापार रीतीस अनुलक्षून वर्तत. ह्यामुळें त्या धर्माचें जें वजन लोकांच्या मनावर पडावयास पाहिजे होतें तें पडलें नाहीं. व अखेरीस होतां होतां त्या धर्माचा ऱ्हास झाला. "

बौद्ध धर्माच्या आजच्या अवनत स्थितीस आत्माराम दादांनीं सांगितलेली स्थिति कारण झाली असेल खरी. तरी पण ह्या एका कारणानें सर्व विचारी लोकांचें समाधान होईल असें आह्मांस वाटत नाहीं. बौद्ध धर्मांतील कांहीं तत्वें अति उदात्त आहेत. ह्या विषयीं मुळीं वादच नाहीं. पण, असें असून शोधकांचें समाधान करण्याचें सामर्थ्य त्या धर्मांत नाहीं, ही महत्वाची गोष्ट आपण विसरतां नये. बौद्ध धर्मांत जीं उदात्त तत्वें आहेत त्या सर्वांस A code of moral laws and principles ( नीति तत्वांचा समुच्चय ) असें नांव देतां येईल. पण, कोरड्या नीतीनें सर्व काळीं, सर्व स्थळीं, सर्व स्थितींतील लोकांचें समाधान होणें शक्य नाहीं. हा संसारशकट हांकीत असतां मनुष्यमात्रावर असे अनेक प्रसंग येतात कीं, ज्यावेळीं अति उच्च अशीं नीतितत्वें त्याचें समाधान करूं शकत नाहींत. अंतःकरणांत होत असलेला एक मंजूळ ध्वनि नीतिपेक्षां अनंत पटीनें ज्यास्त श्रेष्ठ, असें कांहीं तरी आहे असें सुचवीत असतो. त्याच्याच आश्रयानें आपलें जीवित कायम आहे अशी त्याची खातरी होऊं लागते व नंतर उत्तम नीतितत्वें व आस्तिक बुद्धि ह्यांचा सुखकर संयोग झाला ह्मणजे त्याला शांति प्राप्त होते, त्याची चिंता नाहींशी होते व संसारांत मार्ग क्रमण करीत असतां पदोपदीं येणारीं संकटें सहन करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत येतें. बौद्ध धर्मांत ह्या अत्यंत सुखमय स्थितीचा अभाव आहे. व मनुष्यमात्राची नैसर्गिक वृत्ति आस्तिक असल्यामुळें व बौद्ध धर्मांतील कोरड्या नीतितत्वांच्यायोगें त्याचें समाधान न झाल्यामुळें त्या धर्मावरील श्रद्धा उडणें अगदीं साहजिक आहे. असो.

आपल्याला धर्मसंबंधीं जें कांहीं वाटत आहे तें लोकांस सांगावें असें त्यांस फार वाटत असे. अशिक्षित लोकांची आपण हेळसांड न करितां त्यांस शुद्ध धर्माची माहिती करून देण्याचें काम आह्मीं मोठ्या जारीनें करावयास लागलें पाहिजे असें ते ह्मणत. समाजाच्या गेल्या उत्सवाच्या पूर्वीं त्यांची प्रकृति थोडी अस्वस्थ व अशक्त झाली होती. व ह्मणून उत्सवांतील उपासना त्यांनीं घेऊं नये असें सर्वांस वाटत होतें. त्या वेळीं ते ह्मणाले, " मला माझी ही शेवटली उपासना करण्याची वेळ आहे असें वाटत आहे.

माझ्या मनांत तरुण अशा मंडळीस पुष्कळ सांगावयाचें आहे. तें मजपाशींच राहील असें आपण करूं नका." आणि खरोखरच ती त्यांनीं चालविलेली उपासना अखेरचीच झाली! येथून लोणावळ्यास जाण्यापूर्वी त्यांची प्रकृति बरी होती. तेथें गेल्यावर त्यांस एकाएकीं दुखणें येईल असें कोणास वाटलें नाहीं. त्यांनीं तेथें जातांना मुद्दाम वाचण्यासाठीं महान पुरातन संस्कृत लेखांचें ज्यांत भाषांतर आहे असें एक पुस्तकही बरोबर नेलें. **आत्माराम** दादा लोणावळ्यास स्वतःच्या प्रकृतीसाठीं गेले नाहींत. ते आपल्या एका मित्रासाठीं ह्मणून घरांतील सर्व मंडळी नको नको सांगत असतां, गेले. तेथें त्यांस श्रम पडले, त्यामुळें ताप आला; तो बरा झाल्यानंतर एकाएकीं छातींत कांहीं विकार झाला. सोमवार ता० १८ एप्रिल रोजीं त्यांस लोणावळ्याहून येथें आणिलें. त्यावेळीं त्यांच्या प्रकृतीस आराम पडेल असें वाटत होतें. पण नंतर प्रकृतीचें मान विशेष भडकलें, व अखेरीस मंगळवार ता० २६ एप्रिल रोजीं सायंकाळीं पांच वाजून दाहा मिनिटांनीं ह्या पूर्ण शुद्धाचरणी, सुशील, सद्गुणी, परोपकरी, आनंदी, स्वकर्तव्यदक्ष, परदुःख निवारणार्थ तनमनधनेंकरून झटणाऱ्या सद्गृहस्थाची इहलोकींची यात्र संपली.

## अंत्येष्टी.

**आत्माराम** दादांचा अंत होण्यापूर्वी एकदां त्यांचे परमस्नेही रा. रा. वासुदेव बाबाजी नवरंगे हे त्यांचे येथें गेले होते. त्यावेळीं आपल्या आसपास कोणी नाहीं असें पाहून त्यांस **आत्मारादादा** ह्मणाले, "वासुदेवराव, माझा अंतकाल जवळ आला आहे असें आतां मला वाटूं लागलें आहे. माझी अशी इच्छा आहे कीं, आपल्या वहिवाटीप्रमाणें माझ्या शरीरास ताटीवरून नेऊं नये. तें एका पेटींत घालून माटुंग्यास आपली ब्रह्मसमाजाची जागा आहे तेथें न्यावें. व तोंड उघडें ठेवावें. माझ्या शरीराचें दहन व्हावें. व प्रेतयात्रेस येणाऱ्यांनीं उघडें बोडकें न येतां नेहेमींप्रमाणें वस्त्रें परिधान करून यावें." **आत्माराम** दादांनीं हे स्पष्टोद्गार काढिल्यानंतर कांहीं गृहस्थांस वासुदेवरावांनीं त्यावेळची सर्व हकीगत सांगितली. ही त्यांची इच्छा त्यांच्या सर्व मुलांनीं व त्यांच्या प्रियपत्नीनें पूर्ण केली.

ह्या संबंधानें एक दोन महत्वाच्या गोष्टी वाचकांनीं लक्षांत ठेविल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, एकेश्वरी धर्मानुयायी ह्या नात्यानें आपल्यावर एक विशेष जबाबदारी आहे व आपल्या मृत्तिके-समान शरीराची अखेरची व्यवस्थाही त्या जबाबदारीस अनुरूप अशाच रीतीनें होणें अवश्य आहे, असें आत्माराम दादांस आपली इच्छा प्रदर्शित करितेवेळीं वाटलें असावें. व आपल्या बरोबरीच्या किंवा ज्यांची इहलोकींची यात्रा अकालीं संपली अशा आपल्याहून तरुण गृहस्थांची अंत्येष्टी वगैरे त्यांच्या मताविरुद्ध झाली हें गैर झालें, हा विचार ही त्यांस त्यावेळीं सुचला असावा. वास्तविक पाहिलें तर एकदां शरिर आत्मा विरहित झाल्यावर त्याची कोणत्याही रीतीनें व्यवस्था लागली तरी त्याबद्दल विधिनिषेध मानण्याची कांहीं अव-श्यकता नाहीं, अशी शंका यावेळीं कोणी घेईल. परंतु असली शंका घेण्यांत विशेषसी मातब्बरी आहे असें आह्मांस वाटत नाहीं. शरीराची कोणत्याही रीतीनें व्यवस्था लागली तरी त्यामुळें आत्म्यास विशेपसा फायदा होण्याचा संभव नाहीं, असें जरी सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे, तरी अशी शंका काढणारांनीं एकेश्वरी धर्मानुसार अंत्येष्टीचा विधि होते वेळीं काय काय विधी व कृती होत असतात त्यांकडे लक्ष पोंचवावें. प्रेताचें दहन होण्यापूर्वी सर्व साधारणपणें जो चमत्कारिक विधि होत असतो तो विचारास सोडून असतो. त्यावेळच्या अनेक कृती अगदीं वेडगळ व अप्रगल्भ असतात. परंतु हा सर्व प्रकार एकेश्वरी धर्मानें गाळून त्या ऐवजीं ठिकठिकाणीं गंभीर प्रार्थना घालून दिल्या आहेत. परलोकीं आत्म्याला जर कांहीं स्थिति असली तर ती सुखद व्हावी एतदर्थ अत्यंत गंभीरपणें, उदात्त विचारांनीं परिप्लुत अशी अति प्रासंगिक प्रार्थना कोठें, आणि आमच्या स्मशानांतील भटजी बोवांची ती कोणासही न कळणारी व अज्ञान मूलक चर्पटपंजरी कोठें? एकेश्वरी धर्मानुसार गंभीर अशी प्रार्थना होत असतां अंतःकरणाची जी स्थिति होत असते, गतप्राण्याच्या वियोगाचें महत्व जें मूर्तिमंत आप-ल्यापुढें उभें राहतें, तशी स्थिति भटजीबोवा जी कवाईत करावयास सांगत असतात तिच्या योगें होणें शक्य तरी असतें काय? सारांश जीवमान असतांना सर्व कृती स्वमतानुसार करणें हें जर कर्तव्य मानावयाचें, तर

मग अंत झाल्या बरोबर विरुद्ध प्रकार करणें हें कसें विचाराई होईल? असो.

## आत्माराम दादांची खरी योग्यता.

येथपर्यंत आह्मांस मिळालेल्या माहितीवरून संक्षेपानें **आत्माराम दादांचें** चरित्र आह्मीं वाचकांपुढें ठेविलें. त्यावरून त्यांची योग्यता फार मोठी होती, असें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. **डा. आत्माराम** यांनीं कधीं सार्वजनिक सभांपुढें मोठमोठीं व्याख्यानें दिलीं नाहींत; लोकांस थक्क करून सोडण्यासारखे लेखही त्यांनीं कोठें लिहिले नाहींत; ( त्यांनीं १८९९ सालीं Stray Thoughts on the Origin and Development of Religion ह्या विषयावर एक लहानसा निबंध लिहिला आहे. ) मोठे तत्त्वज्ञाते ह्या नात्यानें सुद्धां ते कधीं लोकांपुढें आले नाहींत; आणि इतकें असून ते थोर पुरुष होते, साधुपुरुष होते, अशा विषयीं कोठेंच मतभेद नाहीं, ह्याचें कारण काय असावें? ज्ञानानें, विद्वत्तेनें त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ असे अनेक लोक त्यांस मोठा मान देत असत, ह्याचें तरी कारण काय? **आत्मारामदादांच्या** एकंदर वर्तन-क्रमाकडें पाहिलें ह्मणजे ह्या प्रश्नांचें उत्तर सहज मिळेल. त्यांच्या मृत्यूपूर्वीं सुमारें एकवर्ष त्यांच्या संगतीचा लाभ आह्मांस जितका झाला तितका दुसऱ्या कोणासही झाला नसेल. त्यांच्या सारख्या साधु पुरुषांच्या संगतींत तासच्यातास असणें हें किती सुखमय होत असे तें चांगल्या रीतीनें सांगतांही येणार नाहीं. मी मोठा, हा लहान; मी विद्वान, हा अडाणी; मी अनुभवी, हा अननुभवी, मी श्रीमंत, हा कंगाल; मी लोकनायक, हा यःकश्चित प्राणी; हा भेद कधींही मनांत न आणितां अनेक विषयां संबंधानें अगदीं मोकळेपणानें ते आमच्याशीं बोलत असावयाचे. त्यांची ती प्रेमयुक्त मंजुळवाणी, तें हास्यमुख, तें प्रेम, प्रत्येक शब्दांत दिसून येणारी कळकळ, व स्वमताविरुद्धही दुसऱ्याचें विधान अगदीं शांतपणें लक्षपूर्वक ऐकून घेऊन, प्रेमानें उत्तर देण्याची त्यांची अप्रतिम हातोटी पाहतांच त्यांच्याविषयीं अंतःकरणांत किती तरी पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी! कधींही कोणाची निंदा न करितां त्याच्यांतील दुर्गुण दाखवावयाचे, स्वतःच्या शुद्ध आचरणाविषयीं अभिमान न बाळगितां

योग्य पुरुषांची वाजवी स्तुती करावयाची, असा त्यांचा स्वभाव असे. त्यांचेसारखे शुद्धाचरणी, सरळ स्वभावाचे व आनंदी त्यांच्या पिढींत तर नाहींतच, पण अलीकडल्या पिढींतही सांपडणें कठिण! ह्यावरून खऱ्या थोरपुरुषाच्या ठायीं कोणते गुण विशेष रीतीनें वास करीत असले पाहिजेत तें दिसून येणार आहे. अनेक ग्रंथांचीं पारायणें केलेल्यास लोक कदाचित् विद्वान ह्मणतील; घटकेंत हें सत्य, तर घटकेंत तें सत्य असें सप्रमाण सिद्ध करून देण्याचा अभिमान बाळगणाऱ्यास लोक कदाचित् त्या कामांत पटाईत असें ह्मणतील; पण त्यास कोणी थोर पुरुष ह्मणणार नाहीं. **आत्मारामदादा** सारख्यांच्यापुढें गाडाभर ग्रंथ वाचलेले नामधारी विद्वान फिकेच पडावयाचे. लोक समूहावर वजन पडावयास, त्यांस नीतिपंथानें न्यावयास, कुमार्गापासून त्यांस परावृत्त करावयास, दादांसारखेच पुरुष पाहिजेत. आणि मुंबईंत आज इतकीं वर्षे असा एक निगर्वी पुरुष होता ह्याबद्दल मुंबापुरवासी जनांनीं आपणांस धन्य मानून घेतलें पाहिजे.

## डा. आत्माराम व प्रतापचंद्र मुझुमदार.

कलकत्याचे प्रसिद्ध ब्राह्म गृहस्थ बाबू प्रतापचंद्र मुझुमदार दोन तीन वेळ मुंबईस आले होते. त्यावेळीं त्यांचा **आत्माराम दादांशीं** जो परिचय झाला व त्यावरून त्यांना त्यांचे विषयीं जे विचार सुचले ते त्यांनीं ( प्र. मु. नीं ) एका लेखांत प्रदर्शित केले. त्याचा कांहीं भाग जशाच्या तशाच येथें घेणें जरूर आहे. बाबू प्रतापचंद्र लिहितातः—

"All the time I spent in Bombay during my first visit I stopped at his house, and never had I in those early days seen such a well-trained and highly refined household as Dr. Atmarsm's. The only other family that could approach it was that of Mr. Ramchandra Balkrishna, but he was dead, and Dr. Atmaram was the head, and as it were, the father of both families. The daughters were better educated than any Hindu girl of another Indian city I knew. In his zeal for female education he was unique in those days, and while we in Bengal only talked and discussed the subject, he gave practical effect to his ideas. Not that we agreed on those

ideas; the Bombay men, as well as Keshub Chandra Sen and myself differed from them a good deal. But the straightforwardness and courage with which he carried out his principles on this and other matters almost single-handed, showed that he had the stuff of the true reformer in him, and we all loved and admired him for it. But he was not a mere reformer; he was pure-minded God-fearing man. All the time I knew him he was the President of the Prarthana Samaj and no one ever dreamed of electing any body else at any time. Dr. Atmaram was a popular and extensive medical practitioner, but never did I find him absenting himself from Divine Service, though he had sometimes to leave in the midst of it on urgent calls of professional duty. He was a very quiet man, I never remember to have heard him make a speech. But he was an earnest man, he never trifled with a subject, and nobody could trifle with him. Cordial and warm in his friendship, gentle and kindly to every one, he could be frank, plain-spoken, and fearless. Hence men of sterling worth respected and appreciated him, though he had critics here and there. Nothing struck me as more noteworthy than his friendship with the late Mr. Vishwanath Mandlik. It was like a friendship between Cardinal Newman and Frederick W. Harrison, the Positivist. Yet as both men were genuine, they understood each other inspite of their differences. Of course, such worth as Dr. Atmaram's was highly esteemed by the English community and through him I made an important friendship which did a great deal of good. It must have been by their friendly interest he got the Shrievalty of Bombay. With all the honor he got, and all the reforms he made he never left his simple Hindu habits. He wore the full grown of his white hair with a big tuft at the back of his head. He wore the old-fashioned *dhotar*, ate out of the old-fashioned metal vessels, and spoke the old mother tongue with real pleasure. He was a sort of universal elder brother to the Bombay community. From Morarji Gokuldas and Sorabji Shapurji to the youngest novice of the Prarthana Samaj every one called him Dada. That Dada (elder brother) we have lost. Will Bombay be the

same? Bombay without him? Many cruel sorrows had he suffered in his long life, many disappointments and grievous losses. But he bore his burden silently and patiently like a man. He loved man, he trusted in God, he did his duty to the last. Let all theists join in praying for the rest of the spirit of Dr. Atmaram Pandurang.

## लोकमत.

**डा. आत्मारामपांडुरंग** ह्यांच्या मृत्यूनंतर मुंबई इलाख्यांतील बहुतेक सर्व पत्रांनीं व मद्रास, कलकत्ता, लाहोर, येथील पुष्कळ वृत्तपत्रांनीं खेद प्रदर्शक लेख लिहिले. त्यासर्वांचा येथें उल्लेख करितां येणें शक्य नाहीं. विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, **डा. आत्माराम** हे सुप्रसिद्ध सुधारक असूनही सुधारणेस प्रतिकूल असणाऱ्या अनेक पत्रांनीं त्यांच्या नीतिधैर्याबद्दल व त्यांच्या खऱ्या खऱ्या योग्यतेबद्दल योग्य ती स्तुती केली. नवीन विचारांच्या मंडळीनें दादांस चांगलें ह्मटलें तर त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. त्यांची खरी योग्यता कळावयास त्यांस साधनें असत; परंतु त्यांच्या विरुद्ध विचारांचा स्वीकार केलेल्या पत्रांनीं त्यांची खरी योग्यता जाणावी हें त्या पत्रांस विशेष भूषणास्पद आहे. सर्व वृत्तपत्रांनीं ते खरे सुधारक होते हें कबूल केलें आहे.

## उपसंहार.

**डा. आत्माराम** ह्यांच्या योग्यतेसारखे थोर पुरुष फार क्वचित पैदा होत असतात. त्यांचा सहवास ज्यांनां घडतो ते धन्य. परंतु त्यांचा सहवास ज्यांस घडतो अशांनीं व त्याच्या कृतीशीं सहवास घडावा अशी इच्छा बाळगणारांनीं त्यांचें चांगल्या गोष्टींत अनुकरण करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे. **डा. आत्माराम** ह्यांच्या वर्तनांतील अनेक गोष्टी अनुकरणीय अशा आहेत. त्यांकडे वाचकांचें लक्ष जाऊन ते त्यासंबंधानें चांगल्यारीतीनें विचार करितील अशी आशा बाळगून त्यांचें हें अल्प जीवनचरित्र संपवितों.